# डांग मधील अराष्ट्रीय कारवाया

## विष्णुकांत

गुजरातमधील डांग हा जिल्हा २६ डिसेंबर १९९८ पासून प्रकाशात आला. पण या जिल्ह्याच्या बाबतीत घडलेल्या अनेक घटना आणि त्यांच्या वास्तविकतांच्या बाबतीत अजूनही सर्वसामान्यांना पूर्ण ज्ञान नाही. त्यामुळे या जिल्ह्यामध्ये घडणाऱ्या अराष्ट्रीय कारवायांचे गांभीर्य अजूनही सर्वांपर्यंत पोहोचले नाही.

डांग जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या दीड लाखांच्या आसपास आहे. त्यापैकी ९५% वनवासी आहेत. महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमा भागात असलेल्या या जिल्ह्यात एकूण ३१२ गावे आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा या जिल्ह्यात ख्रिश्चनांची संख्या पाचशे होती. ती संख्या वाढून आज चाळीस हजारांपेक्षा अधिक झाली आहे. ख्रिश्चनांच्या संख्येत झालेल्या एवढ्या भरमसाठ वाढीमुळेच या जिल्ह्यात अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातील एक समस्या म्हणजे वनवासींची सांस्कृतिक ओळख नष्ट होऊन ख्रिश्चन ओळख प्रस्थापित होऊ लागली आहे. १९९८ साली घडलेल्या घटनांच्या मुळाशी हाच मुद्दा आहे. पौराणिक काळात दण्डकारण्य म्हणून प्रसिद्ध असलेल्या डांग जिल्ह्यात 'भिल्ल' वंशाचे वनवासी बहुसंख्य आहेत. याव्यतिरिक्त कोंकणा आणि वारली वंशाचे लोकही या जिल्ह्यात कमी अधिक प्रमाणात रहात आहेत. या वंशाच्या वनवासींची शैक्षणिक आणि आर्थिक स्थिती भिल्लांपेक्षा तुलनेने अधिक चांगली आहे. या तिन्ही जमातींमध्ये भिल्लांचे धर्मांतरण अधिक प्रमाणात झाले आहे.

सरकारी आकडेवारीनुसार या जिल्ह्यात 'आहवा' येथे एकमात्र चर्च आहे. हे चर्च चर्चेस ऑफ नॉर्थ इंडिया (क.उ.इ.) या कॅथोलिक पंथाचे आहे. अधिकृतपणे एक मात्र चर्च असले तरी ख्रिश्चन संघटनांच्या लेखी मात्र जिल्ह्यात एकूण १३३ गावांमध्ये चर्च आहे. यापुढे जाऊन प्रत्यक्षात अनधिकृतपणे उभ्या राहिलेल्या चर्चची संख्या १५३ च्यावर पोहोचलेली आहे. यापैकी ४३ चर्च बी. डी. असारी या सरकारी अधिकाऱ्याच्या १० वर्षांच्या कार्यकाळात त्यांच्याच प्रोत्साहनाने अनधिकृतपणे उभी करण्यात आली आहेत. या सरकारी अधिकाऱ्याने ४३ ख्रिश्चनांच्या सरकारी अधिकारीत भूखंड दिले आणि चर्च उभारण्याकरता त्याच्याशी संबंधित अटींचे खुलेआम उल्लंघन करण्यात आले. घर बांधण्यासाठी, गुरांसाठी गोठा बांधण्यासाठी मिळवलेल्या जमिनीवर पक्की वास्तू बांधून झाल्यावर असारीने फादरला पाचारण करून, ईमारतीवर क्रॉस ठोकून तेथे चर्च निर्माण केल्याची अनेक उदाहरणे आहेत. दंडकवाण गावात ग्रामपंचायतीच्या जमिनीवर एक चर्च अगोदरच असताना त्याच्या शेजारीच आणखीन एक चर्च बांधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सूरतचे तत्कालीन कलेक्टर आर. एम्. शाह यांच्या ध्यानात आले. त्यांनी ताबडतोब पुढाकार घेऊन अवैध बांधकाम थांबवले आणि बांधलेल्या वास्तूचे राज्य राखीव दलाच्या कॅम्पमध्ये ताबडतोब रूपांतर करण्यात आले. - त्यामुळे गावात आणखीन एक अवैध चर्च उभे राहण्याचा धोका टळला. ख्रिश्चनांनी या जिल्ह्यात जो हैदोस घातला त्याच्या काही उदाहरणांकडे नजर टाकली तरी वनवासींच्या असहायतेचा, निर्बलतेचा फायदा धर्मांतरणासाठी कसा घेतला जातो याची कल्पना येऊ शकेल.

दिनांक ४ नोव्हेंबर ९८ - निरगुणमाल येथील हनुमान मंदिरावर ख्रिश्चनांचा हल्ला झाला. मंदिराची आणि मूर्तीची मोडतोड करण्यात आली. मानवी विष्टा टाकून मूर्ती अपवित्र करण्यात आली. १९९७ मध्ये गाढवी येथील हनुमान मंदिरावरही अशाच प्रकारे हल्ला करण्यात आला होता. मूर्तीचे तीन तुकडे करण्यात आले होते.

११ नोव्हेंबर ९८ - दगुनिया गावात हनुमान मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याच्यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीवर ख्रिश्चनांचा हल्ला झाला. हा हल्ला करणाऱ्यांमध्ये गावाचा माजी सरपंच शिवा भाईजी मुकुंदकर हा अग्रेसर होता. त्याच्यासह त्याची पत्नी रमीबेनही हल्ल्यामध्ये सहभागी झाली होती.

१५ नोव्हेंबर ९८ - निरगुणमाल येथील हनुमान मंदिरावर झालेल्या हल्ल्याचे वृत्त समजताच तेथे प्रत्यक्ष जाऊन स्थितीची पहाणी करून परतणाऱ्या हिंदू संतांच्या वाहनांवर आहवा येथे तुफान दगडफेक करण्यात आली. यामध्ये दक्षिण गुजरातचे साधू समाज प्रमुख स्वामी रामदेवदास महाराज, स्वामी रामविलास महाराज आणि स्वामी ठाकरेदासजी यांच्यावर ही दगडफेक करण्यात आली. आहवाच्या जिल्हाधिकारी कचेरीसमोर भरदिवसा हा हल्ला करण्यात आला होता.

२५ डिसेंबर ९८ - आहवा येथे हिंदू जागरण मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या धर्मसभेवर चर्चमधून बाहेर पडलेल्या लोकांनी हल्ला केला. या धर्मसभेमध्ये संतराम मंदिर करमसदचे स्वामी रामदासजी महाराज, स्वामी असिमानंदजी महाराज आणि साधूसंत सुमारे ५ ते ७ हजार वनवासींच्या समोर शांततेने विचार मांडत होते. बजरंग दलाचे डांग मधील कार्यकर्ते संजय व्यवहारेंना एका पोस्टकार्डाद्वारे धमकीचे पत्रही पाठवण्यात आले होते. अशा स्वरूपाची धर्मसभा घेतली गेल्यास त्याच्या

गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल असे त्या पत्रामध्ये नमूद करण्यात आले होते. धर्मसभेवर हल्ला झाल्यानंतर संजय व्यवहारे या कार्यकर्त्याच्या घरावरही हल्ला करण्यात आला. जीप आणि मोटारसायकलचे नुकसान करण्यात आले. यावरूनच स्पष्ट होते की 'धर्मसभेवरील हल्ला हा पूर्वनियोजित आणि पूर्ण तयारीने करण्यात आला होता. याच रात्री - वांकी (गलकुंड) चे सरपंच दिनकरभाईने केवळ दहशत माजवण्याच्या हेतूने केलेल्या गोळीबारात पाच वनवासी जखमी झाले. या हिंसक पार्श्वभूमीवरच डांग जिल्ह्यातील घटनांकडे बघितले पाहिजे. २५ डिसेंबरला मोठ्या प्रमाणात वनवासींना ख्रिश्चन केले जाते किंवा त्यांचे धर्मांतरण करण्याच्या हेतूने प्रार्थना सभांचे आयोजन केले जाते. २५ डिसेंबरला डांग वगळता अन्य पाच ठिकाणीही धर्मसभांचे आयोजन करण्यात आले होते. पण त्यापैकी कोठेही हिंसा घडली नाही.

ख्रिश्चनीकरणामुळे वनवासींमध्ये वाढणारा अंतर्गत कलह ही एक समस्या गेल्या दशकात अधिक तीव्रपणे जाणवू लागली आहे. जे वनवासी धर्मांतरीत होऊन ख्रिश्चन झाले ते आपल्या परंपरांना विरोध करण्याची भूमिका घेऊ लागले. तशी विरोधी भूमिका घेण्याची तालीम त्यांना धर्मांतर करायच्या वेळेपूर्वीपासूनच चर्च आणि फादरच्या माध्यमातून दिली जात असते. वनवासींमध्ये अंतर्गत कलह माजवून त्यांच्याकरवीच धर्मांतराला पोषक वातावरण तयार करण्याचे कार्य चर्च करत आले आहे.

दोन मुलांच्या कुटुंबातील एक ख्रिश्चन झाल्यास कौटुंबिक कार्यात हिंदू परंपरांनुसार वागायचे की ख्रिश्चन परंपरेनुसार याबाबतीत दोन बंधूंमध्ये भांडणे होऊ लागली आहेत. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे क्रियाकर्म हिंदू पद्धतीने करायचे की ख्रिश्चन पद्धतीने दफन करायचे यावरूनही दोन भावात तंटे होऊ लागले आहेत. दंडकवाण गावात एका हिंदू वनवासी महिलेचे निधन झाल्यावर तिच्या ख्रिश्चन झालेल्या दोन मुलांनी ख्रिश्चन पद्धतीने तिचे दफन करून टाकले. पण हिंदू असलेल्या अन्य दोन मुलांना मात्र आपल्या आईच्या मृत्यूची शोकवार्ताही कळवण्यात आली नाही. त्यांना आपल्या आईचे अंतिम दर्शनही घेणे शक्य झाले नाही. दफन झाल्यानंतर हिंदू मुलांना ही वार्ता कळली. ख्रिश्चन झालेल्या व्यक्तीस हिंदू पद्धतीने होणाऱ्या अंत्यसंस्कारांना उपस्थितही राहू दिले जात नाही. तसा दबाव ख्रिश्चनांकडून टाकण्यात येत असतो. त्यामुळे एकमेकांमधील सौहार्दीचे नाते संपुष्टात आणले जात आहे.

आपल्या कृत्यांच्या समर्थनार्थ ख्रिश्चन बायबलचाच हवाला देतात. ''प्रत्यक्ष येशूनेच असे सांगितले आहे की मी पृथ्वीवर शांतता प्रस्थापनेसाठी आलो नसून फूट पाडण्यासाठीच आलो आहे. भविष्यात प्रत्येक घरात फूट पडेल. वडील आणि मुलगा यांच्यात फूट पडून ते एकमेकांसमोर उभे ठाकतील. आई आणि मुलगी एकमेकींच्या विरोधात उभ्या राहतील.

(बायबल लुक १२/४९ ते ५३, मॅथ्यू १०/३४, ३५, ३६)

जुना करार पुनर्नियम १२/२,३ आणि १३/७ ते १०

डांग जिल्हा आजही जंगलाने पूर्ण वेढलेला आहे. वाघ, अजगर, बिबटे, साप, नाग, अस्वल यासारखे जंगली प्राणी त्या जंगलांमध्ये अगदी सहज दृष्टीस पडतात. प्रत्येक गावाच्या बाहेर 'जंगलच्या राजाचे' वाघाचे प्रतीकात्मक पूजेचे ठिकाण आहे. दरवर्षी गावातील सर्व नागरिक येथे एकत्र येऊन वाघाची प्रतीकात्मक पूजा करतात आणि रक्षणासाठी प्रार्थना करतात. याव्यतिरिक्त नाग, डुंगर, आदी देवतांचीही परंपरागत पूजा केली जाते. पण ख्रिश्चनांच्या वाढत्या प्रभावामुळे हे परंपरागत सण साजरे करणे वनवासींना कठीण होऊ लागले आहे. ख्रिश्चन झालेले वनवासी अशा सणांसाठी १०/१५ रूपयांची वर्गणीही देण्याचे टाळू लागले आहेत. नवसारी जिल्ह्याचे पोलिस अधिक्षक अमरसिंग बसावा यांनी ख्रिश्चनांमुळे सामाजिक आणि सांस्कृतिक सौहार्दता नष्ट होत असल्याने ताण तणाव वाढत असल्याचे मान्य केले आहे. ख्रिश्चन झालेल्या वनवासींना आपल्या हिंदू प्रथा मोडण्यास भाग पाडले जात आहे. लग्नसमारंभाच्या वेळी धर्मगुरूला पायाला स्पर्श करून नमस्कार करण्याच्या प्रथेला टाळून हस्तांदोलन करण्याचा आग्रह महिलांनाही केला जातो. वडिलधाऱ्या मंडळींनांही ही पद्धत नापसंत आहे पण असहायतेपोटी ते चूप बसतात. हिंदू देवतांचे अश्लील आणि विकृतपणे उल्लेख करण्याचे कार्यही ख्रिश्चनांकडून केले जाते. गोंडलविहार गावाच्या गोंड बाजार परिसरात १४ जानेवारी ९९ ला हनुमान, शिव आणि श्रीराम यांना हिंदू देवतांचा उल्लेख अनुक्रमे माकड, भूत आणि शिकारी असा उघडपणे करून हिंदू देवतांचा अपमान करण्यात आला.

## धर्मांतरणाच्या विविध तऱ्हा

जामनविहिरच्या गुलाबभाई या इसमाला खूप आजारपणामुळे वैताग आला होता. गावातल्या पास्टरने त्याला ख्रिश्चन होण्याचा सल्ला दिला. तसे झाल्यासच गुलाबभाईचे आजारपण दूर होईल असे पास्टरने

सांगितले. परिणामतः गुलाबभाईने धर्म बदलला. तरीही त्याचे आजारपण दूर झाले नाही. गुलाबभाईची बायको शीतूबेन हिंदू आहे. ती माकडांची, भूताची पूजा करते आहे म्हणून गुलाबभाईचे आजारपण दूर होत नाही. असे पास्टरने सांगितले. अखेरीस सर्व कुटुंबाने ख्रिश्चन धर्म स्वीकारला तरी गुलाबभाई बरा झाला नाही. उलट आजार बळावून त्याचा मृत्यू झाला. शीतू बेन आणि त्यांच्या सर्व परिवाराला वास्तविकता लक्षात आली आणि उनई माता कुंडामध्ये स्नान करून ते सर्व पुन्हा हिंदू झाले.

जामविहिरच्याच अरूणा चंदू पवार ही बालिका सात वर्षांची असताना आपल्या गावातल्या'बाप्तिस्मा' कार्यक्रमाला केवळ प्रेक्षक म्हणून, गंमत बघायला म्हणून गेली होती. पाद्रीने या बालिकेलाही बाप्तिस्माचे पाणी पाजले आणि ख्रिश्चन करून टाकले. अल्पवयीन मुलांचा धर्म बदलणे कायदेशीर अपराध आहे हे ध्यानात घेता अशा घटनांचे गांभीर्य ध्यानात घेतले पाहिजे.

डांग जवळील गलकुंड, अहवा येथील ख्रिश्चन मधुगवळी वासदा सुमित्राबेन पटेल बरोबर विवाह न करताच रहात असे. सुमित्राबेन गर्भवती राहिल्यावर मधुगवळी लग्न करण्याचे टाळू लागला. लग्न करण्यासाठी त्याने सुमित्राबेनला ख्रिश्चन होण्याची अट घातली. कालांतरानंतर या प्रकरणावर खूप गोंधळ झाला होता. सूरत जिल्ह्यातील, राशमाटी गावात रमेशभाई माकडियाभाई गामित या शेतमजूरावर ख्रिश्चन होण्यासाठी पास्टर लिमनीभाई गामित आणि त्याचे सहकारी दबाव टाकत होते. पण रमेशभाईने त्यांना दाद लागू दिली नाही. परिणामी ३ जानेवारी ९९ रोजी लिमजीभाई गामितने आपल्या पाच सहकाऱ्यांसह रमेशभाईला भर रस्त्यात गाठून मारले. त्याला चर्चमध्ये घेऊन जाऊन तेथील खांबाला बांधून ठेवण्यात आले. तशा अवस्थेत रात्रभर रमेशभाईची पिटाई चालू होती. रडतियाभाई पवारने रमेशभाईची दुसऱ्या दिवशी सुटका केली. सोनगढच्या पोलिस चौकीत तक्रार नोंदवण्यात आली.

उधना गावात उर्मिलाबेन विश्वकर्मा नावाची महिला राहते. तिच्या हिनलबेल नावाच्या मुलीला पोलिओ झाला आहे. या मुलीला बरे करण्याच्या निमित्ताने चर्चने या गरीब कुटुंबाला आपले लक्ष्य बनवले. हिनलबेल ही बरी झाली नाहीच. पण काबाडकष्ट करून उर्मिलाबेनने जमवलेले पैसे एकत्रित करून घर बांधण्यास सुरूवात केली होती. राजू नावाच्या पास्टरने या उर्मिलाबेनला अगोदर ख्रिश्चन बनण्यास सांगितले. जोपर्यंत ख्रिश्चन बनत नाही तोपर्यंत घर बांधू देणार नाही अशी त्याची धमकावणी ऐकल्यानंतर गावकऱ्यांनी उर्मिलाबेनची बाजू घेतली.

आपली आर्थिक स्थिती खराब होती, सततच्या आजारपणाला आपण कंटाळलो होतो आणि म्हणून मदत मिळण्याच्या आशेने आपण ख्रिश्चन झालो असे डांग जिल्ह्यातील पास्टर जल्दुभाई आणि पास्टर यशवंतभाई यांनी सांगितले. या दोघांचीही मुलाखत जानेवारी ९९ च्या इंडिया टुडेच्या अंकात छापली गेली आहे. त्यानंतर हे दोघे आणि अन्य काही पास्टरांना आपली चूक समजली. चर्चने आपल्याला फसवले आहे हे लक्षात आल्यानंतर ते पुन्हा आपल्या धर्मात परत आले. पिपलवाडा तालुक्यातील व्यारा गावातील नानूभाई कोकणीने सांगितलेल्या अनुभवानुसार, 'गावातील लोक जेव्हा पांडर देवाची पूजा करत असत तेव्हा त्यांच्यावर गुलेल आणि काठ्यालाठ्यांसह ख्रिश्चनांचा हल्ला होत असत. तेव्हापासून आपल्या मंदिरांची दुरूस्ती करण्यासाठी गावकऱ्यांचे धाडस होत नसे. १७ वर्षापूर्वी शंकराच्या मंदिरावर कौले टाकत असताना ख्रिश्चनांनी केलेल्या हल्ल्यात अनेकांना मार खावा लागला आहे. स्वामी असिमानंदांनी घेतलेल्या पुढाकारामुळे गावातील वातावरण पुन्हा बदलले. १५ वर्षांनंतर गावात गणेशोत्सव साजरा केला गेला.

डांगमध्ये १९९९ मध्ये मंदिरांवर हल्ला करण्याचे सत्र अव्याहतपणे सुरू होते. १९-२० जानेवारी ९९ रोजी पादलखडीच्या हनुमान मंदिराला आग लावण्यात आली. तेथे गाय, बैलांचा एक सांगाडा टाकण्यात आला होता. मंदिराच्या प्रांगणात क्रॉस ठोकण्यात आला होता. मंदिरातील २०-२५ फोटोंना आग लावण्यात आली. २९-३० जानेवारीला धुमकल येथील शिवमंदिराची मोडतोड करण्यात आली. शिवलिंगाचे दोन तुकडे करण्यात आले. या दोन्ही घटनांच्या संदर्भात पोलिस तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ करत होते. नंतर नोंदवून घेतलेल्या तक्रारीमध्ये कोणाच्याच नावाचा उल्लेख न केल्यामुळे अजूनपर्यंत कोणालाच अटक करण्यात आली नाही. मंदिरांची मोडतोड, गाय-बैलांचे अवशेष मंदिर परिसरात टाकून केलेली विटंबना आणि केलेल्या प्रचंड विध्वंसाबद्दल कोणाही लोकप्रतिनिधीने अथवा नेहमी सर्वधर्मसमभावाचे गोडवे गाणाऱ्या एकाही इंग्रजी वृत्तपत्राने साधी दखलही घेतली नाही.

आपली परिस्थिती, अज्ञान आणि असहायतेचा फायदा घेऊन आपले धर्मांतरण केले जात आहे हे आता वनवासींना ध्यानात आले आहे. अज्ञान आणि लोभाच्या पायी धर्मांतर करून आपण आपल्या प्राचीन परंपरांपासून जीवनप्रणालीपासून दूर जात आहोत. हे ध्यानात आल्यावर कित्येक वनवासी हिंदू धर्मात परत येत आहेत. उनई कुंडामध्ये स्नान करून, श्रीराम, अंबामाता आणि उनई देवीचे दर्शन करून हे

वनवासी हिंदू धर्मात परत येत आहेत. अशांवरही चर्चच्या निर्देशानुसार हल्ले होत आहेत. २९ डिसेंबर ९८ रोजी पुन्हा हिंदू धर्मात आलेल्या सुडियाबरडा गावच्या लक्ष्मणभाई कनुभाई वाघमारेला आणि त्याच्या कुटुंबियांना ख्रिश्चनांनी घरात घुसून मारहाण केली.